मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवड शहरातील 9 सिग्नल बंद!

## वीज पुरवठा खंडित झाल्याने बंद पडल्याचा दावा : पोलिसांवर आली हाताने वाहतूक नियंत्रण करण्याची वेळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पहिल्याच पावसात विविध ठिकाणांचे ९ सिग्नल ऐन वाहतुकीच्या 'रश अवर्स' मध्ये बंद पडले. पर्यायाने वाहतूक पोलिसांची मोठी दमछक झाली. मात्र, शहरातील एकाच वेळी एवढे सिग्नल पडूनही महापालिका प्रशासन त्याबाबत अनभिज्ञ होते. कदाचित, वीजपुरवठा खंडित झाल्याने ते बंद पडले असतील, असा दावा महापालिकेच्या विद्युत विभागाने केला आहे.



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध ठिकाणी जवळपास चालू स्थितीतील ७१ सिग्नल आहेत. यातील बहुतांश सिग्नल मुख्य चौकात असल्याने वाहतूक नियंत्रण व्यवस्थित होते. मात्र, मंगळवारी पिंपरी-चिंचवड शहर परिसरासह उपनगरात कोसळलेल्या पावसामुळे यापैकी सिग्नल यंत्रणा बंद पडली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली होती. निवडणुकीच्या बंदोबस्तात तैनात असलेल्या वाहतूक पोलिसांना धावपळ करावी लागली. सिग्नल सुरू होत नसल्याने अखेर हाताने वाहतूक नियंत्रण करण्याची वेळ पोलिसांवर आली. रात्री उशिरापर्यंत ९ पैकी अनेक सिग्नल सुरू झाले नव्हते.

दरम्यान, शहरातील सिग्नल यंत्रणा महापालिकेच्या विद्युत विभागात मोडते. त्या यंत्रणेची स्वतंत्र देखभाल दुरुस्ती करण्याची गरजेची नसते, असे महापालिकेने स्पष्ट केले. ते कायम सुरू असल्याने कदाचित वीज पुरवठा खंडित झाल्याने अथवा ट्रीप झाल्याने सिग्नल बंद पडले असतील. त्याबाबत कोणतीही माहिती महापालिका प्रशासनाला कळवली नव्हती. दुसरीकडे, वाहतूक पोलिसांच्या म्हणण्यानुसार सिंग्नल यंत्रणा बंद पडल्यास त्याची माहिती महापालिका कळवण्यात येते. त्यानुसार संबंधित यंत्रणेची दुरुस्ती होते.

> “ सिग्नल यंत्रणा २४ तास सुरू असते. कदाचित वीज पुरवठा खंडित झाल्याने ते बंद पडली असतील. त्या बाबत तक्रार ही कुठली आली नाही . तरी पावसामुळे तांत्रिक बिघाड झाला असावा.
>
> **- बाबासाहेब गलबले, सह-शहर अभियंता, विद्युत विभाग.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार गटाला ‘गळती’

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते विनायक रणसुभे यांचा शरद पवार गटात प्रवेश : शहरातील राजकीय चित्र बदलणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला ‘गळती’ सुरू झाली आहे. आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी आता हातात ‘तुतारी’ घेण्याची भूमिका घेतली आहे.



राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते विनायक रणसुभे यांनी आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. यावेळी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे उपस्थित होते.

राजकीय रणनितीकार आणि फर्डे वक्ते अशी विनायक रणसुभे यांची ओळख आहे. तसेच, ते अजित पवार गटातील माजी आमदार विलास लांडे यांचे निकटवर्ती आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेत त्यांनी नगरसेवक म्हणून कार्यकाळ गाजवला आहे. रणसुभे यांच्या मागे आता लवकरच आणखी काही स्थानिक नेते शरद पवार गटात प्रवेश करतील, असा दावा केला जात आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत खरी राष्ट्रवादी कोणाची? याचे उत्तर मतदारांनी दिले आहे. शरद पवार साहेबांच्या विचारांवर आणि नेतृत्त्वावर विश्वास ठेवून अनेकजण आगामी काळात पक्षात प्रवेश करतील. आता विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्ये लोकसभा निवडणुकीची पुनरावृत्ती होणार आहे. ‘जनाधार’ हा शरद पवार साहेबांच्या पक्षाला आहे. त्यामुळे आगामी काळात शहरातील राजकीय चित्र बदललेले पहायला मिळेल.

### अजित पवार गटातील दिग्गज वेगळ्या विचारात..

» लोकसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमध्ये शिरुर लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि मावळ लोकसभा मतदार संघात श्रीरंग बारणे यांच्या विरोधात अजित पवाट गटातील काही नेत्यांनी छुप्या पद्धतीने काम केले. तसेच, भोसरी मतदार संघात काहीजणांनी ‘तुतारी’ चालवली, असा दावा केला जातो. राज्य पातळीवर शरद पवार गटाला मिळालेले यश पाहता आणि मतांची आकडेवारी पाहता पिंपरी-चिंचवडमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिग्गज नेते अजित पवार गटाला रामराम ठोकणार आहेत. कारण, महायुतीच्या जागावाटपामध्ये चिंचवड आणि भोसरीवर भाजपा दावा करणार असून, पिंपरी मतदार संघात विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांचा दावा राहणार आहे. परिणामी, विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या दिग्गजांना शरद पवार गट किंवा उद्धव ठाकरे गटाचा विचार करावा लागेल.

# भाजपसाठी कोथरूड नवे ‘सत्ताकेंद्र’

## शहर भाजपची सूत्रे कोथरूडमधूनच हलणार : ‘कसब्या’ची मक्तेदारी संपुष्टात

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीने ‘सत्ताकेंद्र’ असलेल्या कसबा विधानसभा मतदारसंघाची मक्तेदारी संपुष्टात आली असून भाजपसाठी कोथरूड आता नवे सत्ताकेंद्र झाले आहे. लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार, माजी केंद्रीय मंत्री आणि पालकमंत्री, विद्यमान मंत्र्यांबरोबरच शहर मध्यवर्ती कार्यालयही कोथरूड विधानसभा मतदारसंघात असल्याने शहर भाजपची सूत्रे कोथरूडमधूनच हलणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




काही वर्षांपूर्वीपर्यंत शहर भाजपचा कारभार कसबा विधानसभा मतदारसंघातून चालत होता. कसबा विधानसभा मतदारसंघाचे पाच वेळा आमदार राहिलेले दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्याकडे शहराची सर्व सूत्रे होती. तांबडी जोगेश्वरी येथील कार्यालयातून कामकाज पाहिले जात होते. ऑक्टोबर २०१९ च्या निवडणुकीत मंत्री चंद्रकांत पाटील यांना कोथरूड येथून उमेदवारी जाहीर केल्यानंतर कोथरूड नवे सत्ताकेंद्र होण्याच्या दृष्टीने बीजे रोवली गेली. या मतदारसंघातून आमदार आणि पुढे पालकमंत्री झाल्यानंतर शहराची सूत्रे पाटील यांच्या हाती राहिली. बापट यांच्या निधनानंतर तर गेल्या वर्षभरात कोथरूडचे महत्त्व अधोरेखित झाले.

विद्यमान खासदार मुरलीधर मोहोळ हे कोथरूडमधील आहेत. महापालिकेत भाजपची सत्ता असताना त्यांना स्थायी समिती अध्यक्षपद आणि महापौरपदही देण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीसाठी मोहोळ यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर अन्य भागावर अन्याय का, अशी विचारणा करत काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. तत्पूर्वी कोथरूडच्या माजी आमदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांना भाजपने राज्यसभेची उमेदवारी दिली. माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकरही याच मतदारसंघातील आहेत. चंद्रकांत पाटील यांच्याकडे सध्या पालकमंत्री पद नसले तरी, ते राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री आहेत. त्यामुळे सध्या दोन खासदार, एक माजी केंद्रीय आणि राज्यातील मंत्री कोथरूडमधील आहे.

गेली कित्येक वर्षे तांबडी जोगेश्वरी येथील कार्यालयातून कामकाज चालत होते. मात्र, ती जागा अपुरी पडत असल्याने २०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी शिरोळे रस्त्यावर भाजप कार्यालय स्थलांतरित करण्यात आले. या कार्यालयातून भाजपने तीन ते साडेतीन वर्षे कारभार केला. त्यानंतर महापालिका भवनाजवळ कार्यालय हलविण्यात आले. ती जागाही अपुरी पडत असल्याचे सांगत डीपी रस्त्यावरील जागेत शहर कार्यालय स्थलांतरित करण्यात आले आहे. सध्या ही जागा भाडेकरारावर असली तरी, तेथेच नवी जागा घेऊन कायमस्वरूपी कार्यालय करण्याचे प्रयत्न भाजप नेत्यांकडून सुरू झाले आहेत.

### कॉँग्रेसच्या मतांमध्ये दीड ते पावणेदोन लाखांची वाढ

» लोकसभा निवडणुकीच्या निकालातून कॉँग्रेसच्या एकूण मतांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या निवडणुकीत कॉँग्रेसला ३ लाख ८ हजार २०७ मते मिळाली होती. या निवडणुकीत कॉँग्रेस उमेदवाराला ४ लाख ६१ हजार ६९० मते मिळाली आहेत. त्यामुळे कॉँग्रेसच्या मतांमध्ये दीड लाखाने वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

### ‘कसब्या’तील मताधिक्य चर्चेत

वर्षभरापूर्वी झालेल्या पोटनिवडणुकीत कसब्यातून धंगेकर यांनी विजय मिळविला होता. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या मतदारसंघातच धंगेकर यांनी भाजप उमेदवाराला पराभूत करत विजयश्री खेचून आणली होती. धंगेकर यांनी अकरा हजारांनी विजय मिळविला होता. बालेकिल्ल्यातील या पराभवाची पुनरावृत्ती लोकसभा निवडणुकीत होऊ नये, याची दक्षता पोटनिवडणुकीनंतर घेण्यात आली. त्यामुळे ‘कसब्या’तून धंगेकर यांनी तुल्यबळ लढत दिली असली, तरी मोहोळ यांची आघाडी वाढली.

# आरोपी अल्पवयीन मुलाचा बालसुधारगृहातच मुक्काम

## कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला 12 जूनपर्यंत बालसुधारगृहातच

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला १२ जूनपर्यंत बालसुधारगृहातच ठेवण्याचा आदेश बाल न्याय मंडळाने बुधवारी दिला. मुलाचे समुपदेशन करण्यात येत असून, सुधारगृहातून सुटका झाल्यास त्याच्या जीवाला धोका असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर बाल न्याय मंडळाने याबाबतचा आदेश दिला.





बाल न्याय मंडळाने या प्रकरणात मुलाला बुधवारपर्यंत (५ जून) बालसुधारगृहात पाठविण्याचा आदेश दिला होता. मात्र, त्याला आणखी १४ दिवस बालसुधारगृहात ठेवण्यात यावे, असा अर्ज सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी केला होता. या अर्जावर मंडळातील न्यायदंडाधिकारी जे. एम. चौहान यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. त्यानंतर त्याला १२ जूनपर्यंत बालसुधारगृहातच ठेवण्याचा आदेश देण्यात आला.

कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी अपघात झाला. त्याच दिवशी अल्पवयीन मुलाला जामीन देण्यात आला होता. त्यानंतर मुलाला वाचविण्यासाठी कट रचण्यात आला. याप्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मुलाची मुक्तता केल्यास तपासात अडथळा निर्माण होऊ शकतो, तसेच पुराव्यात छेडछाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार करून मुलाला १४ दिवस बालसुधारगृहात ठेवण्यात यावे, असे सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी न्यायालयात सांगितले. मुलाच्या वतीने ॲड. प्रशांत पाटील यांनी बाजू मांडली.

### मुलाला सज्ञान ठरविण्यासाठी चाचणी

» मुलाला सज्ञान ठरविण्यासाठी काही चाचण्या करण्यात येणार आहेत. याबाबतची पूर्तता करण्यासाठी पोलिसांना आणखी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे मुलाला आणखी १४ दिवस बालसुधारगृहात ठेवण्यात यावे, अशी विनंती सहायक आयुक्त तांबे यांनी न्यायालयाकडे केली.

### मुलाचे समुपदेशन करण्याची गरज

मंडळातील समुपदेशक आणि मानसोपचार तज्ज्ञांकडून मुलाचे समुपदेशन करण्यात येत आहे. समुपदेशन सत्र अद्याप पूर्ण झाले नाही. त्याला व्यसनाधीनतेपासून परावृत्त करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे, असे सरकारी वकील मोनाली काळे यांनी न्यायालयात सांगितले.

# पावसाळ्यात पिंपरी-चिंचवड शहर तुंबणार?

## शहरातील नालेसफाई पूर्ण झाली नसल्याने आयुक्त शेखर सिंह यांनी नालेसफाईची पाहणी केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाला सुरुवात झाली, तरी पिंपरी-चिंचवड शहरातील नालेसफाई पूर्ण झाली नसल्याने आयुक्त शेखर सिंह यांनी नालेसफाईची पाहणी केली. नालेसफाईला गती देऊन नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी आरोग्य विभागाला दिल्या.

शहरातील विविध भागातील नाल्यांची, तसेच पाणी साचणाऱ्या संभाव्य ठिकाणांची आयुक्तांनी पाहणी केली. तसेच, पावसाळ्यामध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन आजूबाजूच्या घरांमध्ये नाल्याचे पाणी जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी. सातत्याने स्थळपाहणी करून पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा होईल आणि रस्ते जलमय होणार नाहीत याची काळजी घ्यावी, तसेच सांडपाणी वाहिनी व पाणीपुरवठा विभागाची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचनाही आयुक्त सिंह यांनी दिल्या. आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी या वेळी उपस्थित होते. 'अ' क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २५ नाले, 'ब' १५, 'क' २९ , 'ड' १२, 'ई' १६, 'फ' १८, 'ग' ९ आणि 'ह' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत २० असे एकूण १४४ नाले महापालिका हद्दीमध्ये आहेत.

चिंचवड, आकुर्डी रुग्णालय, निगडी उड्डाणपूल, माता अमृतानंदमयी शाळा, राधा स्वामी सत्संग भवन, बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी उड्डाणपूल, धावडे वस्तीकडील उतार, पीसीएमसी चौक, आदिनाथनगर, आदिनाथ सोसायटीजवळील महामार्गाचा भाग येथील नाल्यांची, तसेच संभाव्य पाणी साचणाऱ्या भागांची आयुक्तांनी पाहणी केली.

पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, त्याचा त्वरित निचरा व्हावा, यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून पावसाळी गटार टाकल्या जातात. पण मोठा पाऊस झाला की रस्त्यांना नद्यांचे स्वरूप येऊन वाहतुकीचा खोळंबा होतो. या गटारांची, चेंबरची स्वच्छता केल्याचे सांगितले जात असले तरी पाणी साचते. शहरात नुकत्याच झालेल्या वळवाच्या पावसामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी तळी निर्माण झाल्याचा अनुभव पुणेकरांनी घेतलाआहे.

सर्वाधिक पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांचे १०० टक्के काम झाल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी अद्याप ८४ किलोमीटर लांबीच्या गटारांची आणि १४ हजार चेंबरची स्वच्छता बाकी आहे. अनेक ठिकाणी चेंबरच्या झाकणात अडकलेली माती, कचरा काढण्यात कामाचा दर्जाही राखलेला नाही



> दोन-तीन वेळा पाऊस पडल्याने सिमेंटच्या झाकणांना अडकून राहिलेला कचरा काढून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. पावसाळ्यात जाळीवरील कचरा दररोज काढावा, असे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. गटारातील केबल काढून टाकल्या जात आहेत. ठेकेदारांनी व्यवस्थित काम केले नाही, तर उपअभियंत्यांवर कारवाई करणार आहे. उर्वरित कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील.
>
> - दिनकर गोजारे, अधिक्षक अभियंता, मलनिस्सारण विभाग.

### अशी आहे स्वच्छतेची पद्धत

» प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाची जबाबदारी एका ठेकेदाराकडे ठेकेदाराकडून केवळ पावसाळी गटाराच्या पाइपच्या तोंडावरील माती, कचरा काढला जातो. आतील कचरा काढला जात नाही. त्यावर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना नियंत्रण ठेवावे लागते ठेकेदार व्यवस्थित काम करत आहे की नाही, हे तपासण्यासाठी टँकरने पाइपमध्ये पाणी टाकले जाते किंवा एका -चेंबरमधून बॅटरीचा प्रकाश टाकला जातो व दुसऱ्या चेंबरमध्ये आरसा पकडला जातो विनाअडथळा प्रकाश पोहोचला तरच व्यवस्थित स्वच्छता झाल्याचे समजते.

# कुदळवाडीतील आगीत चार कारखाने जळून खाक

## रबराचा कारखाना, गोदाम असलेल्या कारखान्याला अचानक आग, सर्वांच्या प्रयत्नांमधून आगीवर नियंत्रण

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडी येथील पवारवस्ती परिसरात गुरुवारी (ता.६) सकाळी लागलेल्या आगीत रबर मोल्डिंगचे चार कारखाने जळून खाक झाले. सकाळी आठ वाजता लागलेली आग अग्निशामक दलाच्या आठ बंबांच्या साहाय्याने दुपारी दीड वाजता नियंत्रणात आली. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असल्याचे स्थानिक नागरिक सांगत असले तरीही आगीचे नेमके अधिकृत कारण कळू शकले नाही.

अग्निशामक दलाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कुदळवाडी येथील पवार वस्ती परिसरात गुरुवारी सकाळी आठ वाजता रबराचा कारखाना आणि गोदाम असलेल्या कारखान्याला अचानक आग लागली. आग लागल्याचे समजताच हाकेच्या अंतरावर असलेल्या चिखली येथील अग्निशामक केंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाला मात्र, रबर मोल्डिंगचा कारखाना आणि त्यामध्ये मोठ्या प्रमाणात साठवण्यात आलेले रबर यामुळे आगीने लगेच भडका घेतला. एका कंपनीत लागलेली आग शेजारील दुसऱ्या कंपनी आणि गोदामाकडे सरकण्यास सुरूवात झाली. आगीची तीव्रता लक्षात घेता आणि शेजारील मोठ्या प्रमाणात असलेली गोदामे आणि कंपन्यांपर्यंत त्याची तीव्रता वाढत जाईल आणि संपूर्ण परिसर आगीच्या भक्ष्यस्थानी पडेल, असे लक्षात आल्याने अग्निशामक अधिकाऱ्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका अग्निशामक विभागाचे सहा बंब आणि खासगी कंपनीचे दोन बंब घटनास्थळी बोलावले. आठ अग्निशामक बंब आणि स्थानिक नागरिकांनी दिलेल्या टँकरच्या साहाय्याने दुपारी दीड वाजेपर्यंत आग नियंत्रणात आणण्यात आली.



### सर्वांच्या प्रयत्नांमधून आगीवर नियंत्रण

» अग्निशामक विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबरच पोलिस प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मदत केल्याने आग लवकर आटोक्यात आणण्यात यश आल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. आग नियंत्रणात आली असली तरीही रबराच्या ढिगाऱ्यामुळे ती धुमसत असल्याचे पहावयास मिळाले.

# रस्त्यांना तळ्यांचे स्वरूप, नागरिक पाण्यात

## पावसाळी गटारे, नालेसफाईची कामे व्यवस्थित पार न पाडल्याने मॉन्सूनपूर्व पावसातच पुणेकरांची दाणादाण

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मंगळवारी (ता. ४) झालेल्या पावसाने रस्ते, चौक, भुयारी मार्गांमध्ये अक्षरशः पाण्याची तळी तयार झाली होती. त्याचा परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होऊन नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. महापालिका प्रशासनाने पावसाळी गटारे, नालेसफाईची कामे व्यवस्थित पार न पाडल्याने मॉन्सूनपूर्व पावसातच पुणेकरांची दाणादाण उडाल्याची स्थिती होती.

शहरातील अनेक ओढे, नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलून तेथे मोठ्या प्रमाणात बांधकाम करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात नदी, नाले व ओढ्यांना पूर येऊन पाणी रस्त्यांवर, सोसायट्या व घरांमध्ये घुसत आहे. त्यातच ओढे, नाले, पावसाळी गटारांमधील गाळ काढणे, सफाई करण्याच्या कामाकडे महापालिका प्रशासन गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे मागील वर्षीप्रमाणे यावर्षीदेखील पहिल्यांदा पावसाचा फटका पुणेकरांना सहन करावा लागला. मंगळवारी शहरात झालेल्या पावसामुळे मुख्य रस्ते, चौक, भुयारी मार्गांमध्ये पाणी साठल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागला. दरम्यान, शहरात पाणी साठण्याच्या ठिकाणांबाबतची माहिती पुणे पोलिसांच्या वाहतूक विभागाकडून महापालिका प्रशासनाला देण्यात आली आहे. संबंधित ठिकाणी पाणी साठू नये, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबतचे पत्रही वाहतूक शाखेने महापालिकेला दिले आहे. तरीही, महापालिकेने सुधारणा करण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक पोलिस, कार्यकर्ते व नागरिकांनाच रस्त्यावर साठलेले पाणी काढण्याची वेळ आली.

आळंदी मार्गावर देखील म्हस्के वस्ती पुलावर कंबरे भर पाणी साचल्याने लोकांनी पाण्यातून रस्ता काढला. मात्र येरवडा जवळपास दोन ते अडीच किमी वाहनांच्या लांबवर रांगा लागून वाहतूक कोंडी झाली होती. पालिकेच्या वतीने ड्रेनेज लाईनची करण्यात आलेली कामे ही निकृष्ट दर्जाची झाल्याचे यावरून स्पष्ट होत आहे. दिघी, लोहगाव, तसेच धानोरीच्या डोंगर परिसरातून पाणी अधिक प्रमाणावर वाहून आल्यामुळे पाण्याला मार्ग नसल्याने सर्वत्र पाणी साचले. तर धानोरी, लोहगाव, वडगावशेरी परिसरात ओढे नाल्यावर बांधकाम करून गटर करणाऱ्या लोकांमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची संतप्त प्रक्रिया कार्यकर्त्यांनी दिली आहे.



> रामवाडी भुयारी मार्गामध्ये पाणी तुंबण्याचा प्रकार घडत आहे. रामवाडी येथील झोपडपट्टी व गृहप्रकल्पांमधील सांडपाणी भुयारी मार्गामध्ये जात आहे. त्याविषयी महापालिकेच्या विविध विभागांना पत्र पाठविले आहे. तरीही, प्रशासन त्याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. महापालिका प्रशासन प्रश्न सोडविण्याऐवजी एकमेकांकडे बोट दाखविण्याचे काम करत आहे.
>
> **- कनीज सुखराणी, सामाजिक कार्यकर्त्या**

> धानोरी परिसरातील ओढे, नाले बांधकामासाठी बुजविले आहेत. नैसर्गिक प्रवाह बदलल्याने ओढे, नाल्यांचे पाणी रस्त्यावर येऊ लागले आहे. प्रत्येक पावसाळ्यात लोकांच्या घरांमध्ये पाणी घुसूनही प्रशासन त्याकडे गांभीर्याने पाहत नाही.
>
> **- विवेक बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते**

### पावसाचे पाणी नेहमी साठणारी ठिकाणे

» कसबा पेठेतील दारूवाला पूल, फडके हौदाजवळील देवजीबाबा चौक, लक्ष्मी रस्त्यावरील हमजेखान चौक, पद्मावती, येरवडा येथील गुंजन चित्रपटगृह चौक, रामवाडी येथील भुयारी मार्ग, धानोरी, धानोरी जकात नाका, आंबेडकर शाळा, गोल्फ चौकाजवळील आयबीएम कंपनी, कल्याणीनगर जंक्शन, आळंदी चौक, नगरवाला स्कूल, रामवाडी क्षेत्रीय कार्यालय, वडगाव शेरी येथील अरनॉल्ड स्कूल, कळस फाटा, कॉमर्स झोन, कोरेगाव पार्क येथील ब्लू डायमंड हॉटेल व सेंट मीराज शाळेसमोरील रस्ता, ताडीवाला रोड, सिंहगड रस्त्यावरील हिंगणे, माणिकबाग, धायरी उंबऱ्या गणपती चौक, खोराड वस्ती, आनंदनगर, आनंद विहार, मधुकर हॉस्पिटल परिसर, रेसीडेन्सी क्लब चौक अशा अनेक ठिकाणी पावसाचे पाणी रस्त्यांवर तुंबण्याचे प्रकार घडले. त्याचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिकांना बसला. धनकवडी, पद्मावती, सहकारनगर, महेश सोसायटी, चव्हाणनगर कमान या ठिकाणी तर रस्त्यांना नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले होते. शंकर महाराज मठ उड्डाणपुलाजवळील चव्हाणनगर कमान येथे दुचाकीस्वार पाण्याच्या प्रवाहात वाहत चालल्याची घटना घडली. अनेक ठिकाणी कार, रिक्षा, दुचाकी यांसारखी वाहने पाण्यात अडकून पडली होती. सांडपाण्याचा निचरा होण्याची व्यवस्थाच नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साठण्याच्या घटना घडल्या.

# टोमॅटोचे माहेरघर पुरंदरच्या कृषीविश्वात टोमॅटोवर जोर

## शेतकऱ्याना चांगला बाजारभाव मिळाल्याने लागवडीसाठी जमीनी तयार : पावसाची प्रतिक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यामध्ये बेलसर, वीर, धालेवाडी, कोथळे, भोसलेवाडी, पारगाव, परिंचे, नीरा, दिवे या भागात टोमॅटो पिकाचे विक्रमी उत्पन्न घेतले जाते. वीर आणि बेलसर हे टोमॅटो पिकाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. मागील वर्षी शेतकऱ्यांना चांगला बाजारभाव मिळाल्याने बहुतांश शेतकरी टोमॅटो पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करताना दिसत आहेत.

पुरंदर तालुक्यात मागील वर्षी सुरुवातीच्या काळात अत्यंत कमी क्षेत्रावर लागवड झाली होती; परंतु बाजारभाव वाढल्याने अनेक शेतकऱ्यांनी टोमॅटो लागवडीला पसंती दिली होती.तर यावर्षी तालुक्यात अत्यंत बिकट दुष्काळ असला तरीही शेतकरी टोमॅटो पीक लागवडीस प्राधान्य देत आहेत

अत्यंत कमी पाण्यावर पिकाचे नियोजन शेतकऱ्यांनी केलेले पाहायला मिळत आहे. बेलसर, वीर व दिवे परिसरात टोमॅटोची लागवड करण्यात आली आहे. वीर धरण व पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या पाण्यावर शेतक-यांनी लागवड केल्याचे शेतकरी सांगतात. पावसाचे वातावरण पाहून व पाण्याची उपलब्धता यावर शेतकऱ्यांनी लागवडीचे नियोजन केले आहे.

मागील हंगामातील पिकांची काढणी झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शेताची मशागत पूर्ण केली आहे. त्यामध्ये नांगरट, काकर-पाळी, बेड तयार करणे, ड्रिप बसविने त्यासोबतच इतर टोमॅटो पिकाच्या लागवडीसाठी लागणाऱ्या गोष्टींची तयारी शेतकऱ्यांनी सुरू केली आहे. तर काही प्रमाणात लागवडी सुरू झाल्या आहेत तालुक्यामध्ये सध्या आर्यमान वाणाच्या रोपांची लागवड सुरू आहे. शेतकऱ्याने टोमॅटो लागवडीसाठी जमीन तयार करून ठेवली आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांनी बेड तयार करून त्यावर ड्रीप जोडून जमीन लागवडी योग्य केली आहे; परंतु अद्याप पाऊस पडत नसल्याने शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे..



### रोग व किड नियोजनावर अधिक भर

» मागील वर्षीच्या हंगामामध्ये प्लास्टिक रोग व टुटाआळी, तिरंगा, फळ पोखरणारी आळी, नाग आळी त्यासोबतच इतर करपा, विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव टोमॅटोवर दिसून आला होता. त्यामुळे चालू वर्षी शेतकरी कीटकनाशक, बुरशीनाशक आणि बॅक्टेरिया नाशकाचा अधिकच्या फवारणीसाठी सज्ज आहेत व पिकाचे गुणवत्तापूर्वक उत्पादन काढण्यास शेतकरी सकारात्मक आहेत.

### यंदाही मैलाचा दगड ठरणार?

» मागील वर्षी राज्यभरात जुलै महिन्यात टोमॅटोच्या बाजार भावाने उच्चांक गाठला होता. कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथे टोमॅटो पिकाचे बाजारभाव 2000 ते 5000 रुपये प्रति क्रेट असे होते. त्यामुळे हे यंदाही बाजार भाव असेच राहतील आणि शेतकऱ्यांना अधिकचे पैसे मिळवून देण्यासाठी टोमॅटो मैलाचा दगड ठरेल अशी आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत.